RNI No. MAHBIL /2009/31748
Reg. No. MCS/174/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ४६] बुधवार, ऑगस्ट २४, २०१६/भाद्र २, शके १९३८ [पृष्ठ २, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**नगरविकास विभाग**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ ऑगस्ट २०१६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक स्थासंक. २०१६/प्र.क्र.२६/२०१६/(नवि-३२). —— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम, सदर नियमास १५२न च्या पोट-कलम २ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शासन अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक स्थासंक. २०१६/प्र.क्र.२६/२०१६/(नवि-३२), दिनांक २ ऑगस्ट २०१६ अन्वये पूर्व प्रसिद्धी देऊन करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० च्या नियम ३ मधील उप-नियम (१) मध्ये खालील परंतूक दाखल करण्यात येत आहे :—

"परंतु, आणखी असे की, जे व्यापारी देशी दारू, विदेशी मद्य व वाईन इत्यादी वस्तुंचा व्यवसाय करतात, त्यांची खरेदी किंवा विक्रीची उलाढाल दिनांक १५ ऑगस्ट २०१६ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये रु. ५० कोटींपेक्षा कमी असली तरी अशा व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर नियमाखाली नोंदणी करणे आवश्यक राहील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुधाकर ज्ञा. बोबडे,**
शासनाचे उप सचिव.